**प्रेस नोट** दिनांक. ०५/०६/२०२४

**आरोपी मधुकर बाबुराव गोरे, वय 52 वर्षे, ग्रामविकास अधिकारी (वर्ग ३) पोहंडूळ, ता. मानवत, जि. परभणी यांनी RTGS फॉर्मवर सही व शिक्का देण्यासाठी 20,000/- रुपये लाचेची मागणी केल्याने ॲन्टी करप्शन ब्युरो, परभणी यांचे जाळयात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी युनिट. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | मनवत, जि.परभणी गु.र.नं.२७३/२०२४ कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी मौजे पोहंडूळ ग्राम पंचायत येथील डी.पी.डी.सी. च्या अंतर्गत नाली व सिमेंट रोड तयार करण्याचे काम केलेले होते. <br> दिनांक 06/05/2024 रोजी तक्रारदार यांनी वरील प्रमाणे केलेल्या कामाचे धनादेश मिळविण्यासाठी आरोपी लोकसेवक मधुकर गोरे, ग्रामविकास अधिकारी, पोहंडूळ यांची भेट घेवून धनादेश घेतला. त्यावेळी आरोपी लोकसेवक गोरे यांनी तक्रारदार यांना २०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी नाईलाजास्तव आलोसे यांना 4,000/- रूपये दिले. उर्वरीत रक्कम ही RTGS फॉर्म घेते वेळेस देतो म्हणुन सांगीतले. RTGS फॉर्म वर सही व शिक्का देण्यासाठी पैशांची आवश्यकता लागत नाही, सदर रक्कम ही लाच असल्याने व तक्रारदार यांना लाच द्यायची इच्छा नसल्यामुळे त्यांनी दिनांक 13/05/2024 रोजी एसीबी परभणी कार्यालयात तक्रार दिली. <br> दि.13/05/2024 रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांना दोन को-या RTGS फॉर्म वर आलोसे मधुकर गोरे व सरपंच यांची सही असलेले फॉर्म दिले व 10,000/- रूपये तडजोडअंती लाचेची मागणी केली. <br> दि.05/06/2024 रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे गोरे यांनी तक्रारदार यांचेकडून RTGS फॉर्मच्या केलेल्या कामाचे 10,000/- रुपये लाच रक्कम ग्राम पंचायत कार्यालय पोहंडुळ येथे स्वत: स्विकारली आहे. आलोसे मधुकर गोरे यांना लाचेच्या रकमेसह लागलीच ताब्यात घेण्यात आले आहे. आलोसे मधुकर गोरे यांचेवर पो.स्टे.मानवत गुरनं. 273/२०२४ कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्रए नांदेडचे डॉ. श्री. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. अशोक इप्पर, पोलीस उप अधीक्षक तसेच सापळा कार्यवाही पथक श्री. सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक व टिम एसीबी परभणी यांनी पार पाडली. |
| सापळा व तपास अधिकारी | श्री. सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि युनिट परभणी. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवक/इसमाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रितिबंधक विभागाशी संपर्क साधावा.


| | |
|---|---|
| संपर्क पत्त :– कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी शनिवार बाजार, नानलपेठ, परभणी | |
| संपर्क क्रमांक:– ०२४५२–२२०५९७, टोल फ्री क्रमांक:– १०६४, ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharastra.net | |
| मा. पोलीस अधीक्षक ९६२३९९९९४४ | पोलीस उप अधीक्षक ९८५०४८३३३७ |
| spacbnanaded@ mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook: Anti Corruption Bureau Parbhani | Twitter:@ACBPARBHANI |
| Instagram: acbparbhani | |


पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी